**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**परिपत्रक**

**प्र.ले./वित्त/व्यय/ 11 , दि. 20.8.2019**

विषय:- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा लेआऊट तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी), पी.डब्ल्यू.डी. आणि बी.ई.एस.टी च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत व बाह्य भागात असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत जुन्या जीर्ण जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या ह्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलणे, लादीकरण करणे यासारखी मूलभूत नागरी सुविधा पुरविणे .

संदर्भ:- परिपत्रक क्र. सीए/एफएसडब्ल्यू/४३ दिनांक ०९.०३.२०१५.

परिपत्रक क्र. प्रले/एफडीटी/ए/एफआय/१११ दिनांक ०८.०२.२०१३ अन्वये "लेखा संकेतांक ५०१२००००५ – प्रभाग समितीने सुचविलेल्या भांडवली स्वरुपाच्या रस्ते, पदपथ, रस्त्याच्या बाजूच्या पर्जन्य जलवाहिन्या व सुशोभिकरण आणि इत्यादी विकासकामे यांच्याशी संबंधित प्राधान्याने हाती घ्यावयाच्या कामांसाठी तरतूद" या लेखाशीर्षांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीमधून करावयाच्या अनुज्ञेय कामांच्या यादीमध्ये निर्गमित परिपत्रक क्र. सीए/एफएसडब्ल्यू/४३, दि.०९.०३.२०१५ येथे दिलेल्या निर्देशानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६३ (के) अंतर्गत महानगरपालिकेच्या पूर्व मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रातील बी.डी.डी. चाळी, म्हाडा लेआऊट तसेच बी.पी.टी. च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहतीतील सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून जीर्ण झालेल्या जुन्या जलवाहिन्या व मलनि:सारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे किंवा त्या बदलणे यासारखी कामे अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. सदर तरतुदीतून लादी बसविणे किंवा बदलणे अशा स्वरुपाची कामे करण्यात येऊ नयेत. सदर ठिकाणी कामे सुचविताना ती अशा चाळी/ म्हाडा लेआऊट मधील महापालिकेच्या सार्वजनिक रस्त्यांना जोडणारे मुख्य अंतर्गत रस्ते, आजुबाजुचा सामायिक मोकळा परिसर अशा भागातीलच असावीत. मात्र, अशा चाळी/ वस्त्या/ इमारतींच्या अंतर्गत भागातील कामे म.न.पा. निधीतून करण्यात येऊ नयेत असे निदेश देण्यात आले आहेत.

गटनेत्यांनी सोमवार, दि. १० जून २०१९ रोजी त्यांच्या सभेमध्ये निर्णय घेतल्यानुसार "बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा वसाहती, मुंबई पोर्ट ट्रस्ट (बीपीटी) आणि पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत (गेटच्या आतील भागात) जुन्या जीर्ण जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलणे, लादीकरण करणे यासारखी मूलभूत नागरी सुविधा पुरविण्याची कामे करण्याकरिता प्रभाग विकास निधी, नगरसेवक निधी व म्हाडा वसाहती सुधारण्याकरिताचा निधी अशा इतर निधींचा वापर करण्यास मंजुरी देण्यात यावी" असे प्रशासनास कळविले आहे.

Scanned by CamScanner

महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीतून कोणती कामे करण्यात यावीत व कोणती कामे करण्यात येऊ नयेत हे शासनाने निश्चित केले आहे. त्याप्रमाणे शासनाच्या परिपत्रकानुसार मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी परिपत्रकाद्वारे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व खाते प्रमुख/ सहायक आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने वरील परिपत्रकाद्वारे निर्गमित केलेल्या उपरोक्त निदेशांचे पुनर्विलोकन करण्यात आले असून खालीलप्रमाणे सुधारित निदेश देण्यात येत आहेत.

"लेखा संकेतांक ५०१२००००५ – प्रभाग समितीने सुचविलेल्या भांडवली स्वरुपाच्या रस्ते, पदपथ, रस्त्याच्या बाजूच्या पर्जन्य जलवाहिन्या व सुशोभिकरण आणि इत्यादी विकासकामे यांच्याशी संबंधित प्राधान्याने हाती घ्यावयाच्या कामांसाठी तरतूद" , व म्हाडा लेआऊट, बीपीटी इत्यादी वसाहतीमध्ये कामे करण्याकरिता अर्थसंकल्पात विशिष्टपणे केलेल्या तरतुदीमधून मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६३ (के) अंतर्गत महानगरपालिकेच्या पूर्व मान्यतेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा लेआऊट तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी), पी.डब्ल्यू.डी. आणि बी.ई.एस.टी च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत व बाह्य भागात असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत जुन्या जीर्ण जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या ह्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलणे, लादीकरण करणे यासारखी मूलभूत नागरी सुविधा पुरविणे या कामांचा समावेश केला आहे. मात्र, नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येऊ नये.

उपरोक्त सुधारित निदेशांचे सर्व सहाय्यक आयुक्त/ उपायुक्त तसेच संबंधित विभागीय लेखा अधिकारी यांनी कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| (प्रदिप भ. पडवळ)<br>**प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.** | (श्री. विनोद प्र. चिठोरे)<br>**संचालक (अभि. से. व प्र.)** |
| (श्री.प्रविण दराडे)<br>**अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)** | (श्री. प्रवीण परदेशी)<br>**मा. महापालिका आयुक्त** |

---

परिपत्रक

प्र.ले./वित्त/व्यय/ ११ , दि.२०.८.२०१९

प्रत ————————— यांना ( जादा प्रतीसह) माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

**प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता**

Scanned by CamScanner